# इलेक्ट्रॉनिका फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** औदुंबर, 101/1, एरंडवणे, डॉ. केतकर रोड, पुणे - 411004
CIN: U74110PN1990PLC057017

## संयुक्त सार्वजनिक सूचना

[रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी – प्रमाण आधारित नियमन) निर्देशन, 2023 (यानंतर "निर्देशन" म्हणून संदर्भीत केले जाते) संदर्भ क्रमांक **DoR.FIN.REC.No.45/03.10.119/2023-24,** दिनांक 19 ऑक्टोबर 2023 (वेळोवेळी अद्ययावत केलेले) च्या प्रमुख निर्देशांच्या परिच्छेद 42.3 च्या दृष्टीने]

ही सूचना इलेक्ट्रॉनिका फायनान्स लिमिटेड (**"कंपनी"**) द्वारे वनाका इन्क्लुजन लिमिटेड (**"गुंतवणूकदार 1"**), आविष्कार इंडिया फंड VI (**"गुंतवणूकदार 2"**) ("एकत्रितपणे **प्रस्तावित गुंतवणूकदार** म्हणून संदर्भित") आणि सौ. मनीषा पोफळे ("**हस्तांतरणकर्ता**") यांचे सह निर्देशांच्या परिच्छेद 42.3 च्या अनुशंगाने संयुक्तपणे देण्यात आली आहे.

**पार्श्वभूमी:** कंपनी एक पब्लिक लिमीटेड कंपनी आहे जी डिपॉझिट न घेणारी सुनियोजित तसेच महत्त्वाची नॉन-बँकिंग वित्तीय संस्था म्हणून नोंदणीकृत आहे तसेच निर्देशांनुसार मध्य स्तरावर NBFC म्हणून वर्गीकृत आहे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (**"RBI"**) कडे नोंदणी क्रमांक B-13.01093 च्या प्रमाणपत्राद्वारे नोंदणीकृत आहे, तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक U74110PN1990PLC057017 हा आहे आणि औदुंबर, 101/1, एरंडवणे, डॉ. केतकर रोड, पुणे - 411004 येथे तीचे नोंदणीकृत कार्यालय आहे. कंपनी मशीन कर्ज, MSMEs कर्ज, छतावरील सौर कर्ज आणि मालमत्तेवर कर्ज देण्यासाठी कार्यरत आहे. गुंतवणूकदार 1 ही एक खाजगी कंपनी आहे जी मॉरिशसच्या कायद्यांतर्गत शेयरद्वारे मर्यादित आहे, जीचा नोंदणी क्रमांक 172886 आहे आणि तीचे नोंदणीकृत कार्यालय c/o, ऍक्सिस फिड्युसरी लिमीटेड, दुसरा मजला, द ऍक्सिस, 26 सायबरसिटी, इबेन, मॉरिशस– 72201 या ठिकाणी आहे. गुंतवणूकदार 1 ही लीपफ्रॉग इमर्जिंग कंझ्युमर फंड IV, LP ची अप्रत्यक्ष पूर्ण मालकीची उपकंपनी आहे, जीची आर्थिक सेवा आणि आरोग्य सेवा क्षेत्रात गुंतवणूक आहे. गुंतवणूकदार 2 हा भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्डाकडे नोंदणीकृत श्रेणी – II पर्यायी गुंतवणूक निधी (AIF) आहे ज्याचा नोंदणीकृत क्रमांक IN/AIF2/21-22/0877 हा आहे, आणि नोंदणीकृत कार्यालय युनिट क्रमांक 202-204, दुसरा मजला, नमन सेंटर, C-31, G ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व, मुंबई – 400051 येथे आहे. भारतात आणि परदेशातील सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करणे हा गुंतवणूकदार 2 चा प्राथमिक उद्देश आहे. हस्तांतरणकर्ता हा कंपनीच्या प्रवर्तक गटाचा भाग आहे.

**प्रस्तावित व्यवहार:** प्रस्तावित गुंतवणूकदारांचा कंपनीमध्ये पुढील मार्गाने अतिरिक्त भांडवल गुंतवण्याचा मानस आहे: (अ) कंपनीद्वारे जारी करण्यात येणाऱ्या पूर्ण पेड-अप अनिवार्यपणे परिवर्तनीय प्राधान्य शेयरची प्राथमिक सदस्यता; आणि (ब) गुंतवणूकदार 1 द्वारे इक्विटी शेअर्सच्या दुय्यम खरेदीद्वारे कंपनीच्या विद्यमान इक्विटी शेअर कॅपिटलमधील हस्तांतरकाकडे असलेले भागभांडवल संपादन करणे (संपूर्ण व्यवहार यापुढे "प्रस्तावित व्यवहार" म्हणून संदर्भित केला जाईल).

प्रस्तावित व्यवहारामुळे कंपनीच्या शेअरहोल्डिंगच्या 26% पेक्षा जास्त भागात आणि कंपनीच्या संचालक मंडळाच्या प्रमाणात 33% पेक्षा जास्त बदल होईल, त्यामुळे निर्देशांच्या नियमन 42 अंतर्गत RBI ची पूर्व मंजुरी आवश्यक आहे.

प्रस्तावित व्यवहाराच्या तर्कामध्ये प्रस्तावित गुंतवणूकदारांसाठी गुंतवणूकीची संधी समाविष्ट आहे जी आकर्षक विभागांमध्ये उच्च दर्जाच्या व्यवसायांमध्ये गुंतवणूक करण्याच्या धोरणाशी सुसंगत आहे ज्यामध्ये वित्तीय सेवा क्षेत्रासह आणि कंपनीला त्याच्या निधीची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी त्याच्या निधीची पूर्तता करणे, वाढीच्या योजना यांचा समावेश आहे.

**RBI मंजूरी:** निर्देशांच्या संदर्भात, RBI ने 27 मार्च 2024 रोजी कंपनीला जारी केलेल्या पत्राद्वारे संदर्भ क्रं. CO.DOS.DSD.नं. S10480/02-13-011/2023-2024, प्रस्तावित गुंतवणूकदारांद्वारे प्राथमिक गुंतवणुकीसाठी आणि हस्तांतरणकर्त्याद्वारे शेयरच्या दुय्यम विक्रीसाठी त्याची पूर्व लेखी मान्यता दिली, परिणामी कंपनीच्या 26% पेक्षा जास्त शेअरहोल्डिंगमध्ये बदल होणार. प्रस्तावित व्यवहाराच्या अनुषंगाने कंपनी संचालक मंडळावर प्रस्तावित गुंतवणूकदारांद्वारे अतिरिक्त संचालकांची नियुक्ती देखील RBI ने मंजूर केली आहे.

निर्देशांच्या परिच्छेद 42.3 मधील तरतुदींनुसार, या सार्वजनिक सूचना प्रकाशित झाल्यापासून 30 (तीस) दिवसांच्या आत आणि आधीच्या विविध मान्य अटींच्या पूर्ततेवर प्रस्तावित व्यवहार प्रत्यक्ष लागू केला जाईल.

प्रस्तावित व्यवहारावर कोणतेही स्पष्टीकरण(स्पष्टीकरणे) आणि/किंवा काही आक्षेप असणारी कोणतीही व्यक्ती या नोटीसच्या तारखेपासून 30 (तीस) दिवसांच्या आत कंपनीला तीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर श्री वल्लभ घाटे, कंपनी सचिव यांना पत्र लिहू शकते किंवा secretarial@efl.co.in. वर ईमेल करू शकते.

या सूचनेची प्रत कंपनीच्या www.electronicafinance.com या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी/-<br>**इलेक्ट्रॉनिका फायनान्स लिमीटेड** साठी | स्वाक्षरी /-<br>**आविष्कार इंडिया फंड VI** साठी |
| स्वाक्षरी /-<br>**वनाका इन्क्ल्युजन लिमीटेड** साठी | स्वाक्षरी /-<br>**सौ. मनिषा पोफळे** |